MHPU200021332019

# निशाणी क्र. ५ वरील आदेश

(आदेश पारित दि.२१.०३.२०२४)

अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण देणारा कायदा २००५ चे कलम १२ अन्वये अर्ज दाखल केलेला असून त्यामध्ये अंतरीम पोटगी प्रतिमहा अर्जदार क्र.१ यांस रू.१५,०००/- व अर्जदार क्र.२ यांस रू.१०,०००/- व घरभाडे रक्कम रु.५,०००/-, तसेच नुकसान भरपाई म्हणून रक्कम रू.५ लाख मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदार क्र.१ असे कथन करते की, तिचे व जाबदेणार क्र.१ सोबत दि.०६.०६.२०१० रोजी हिंदु धर्माशास्त्र व रितीरिवाजाप्रमाणे न्हावरा फाटा, ता. शिरूर, जि. पुणे येथे झालेला असुन लग्न संबंधातुन त्यांना दि.१०.०९.२०१२ रोजी मुलगा झाला. लग्नामध्ये अर्जदार हिच्या वडीलांनी अंगठी, नेकलेस, पाटल्या इ. ५ तोळे दागिणे दिले होते ते सर्व दागिणे जाबदेणार यांच्या ताब्यात आहेत. जाबदेणार क्र.१ हा अर्जदार हिचा पती आहे, जाबदेणार क्र.२ हि सासु आहे, जाबदेणार क्र.३ व ४ हे दिर व जाउ आहेत. जाबदेणारांनी अर्जदार हिस सुरवातीचे २ महिने चांगले नांदविले. त्यानंतर अर्जदार गर्भवती राहिली. जाबदेणार क्र.१ ते ४ यांना मुल नको असल्याने गर्भ पाडण्यास तिला भाग केले. जाबदेणार क्र.१ ची नोकरी वडगांव मावळ येथे असल्याने जाबदेणार क्र.१ने अर्धा गुंठयात दोन खोल्यांचे घर विकत घेतले व तेथे राहत होते. जाबदेणार क्र.२ ते ४ हे शुल्लक कारणावरून अर्जदार हिस अपमानास्पद वागणूक देवू लागले. अर्जदार हि दि.०७/०९/२०१८ रोजी पर्यंत सासरी राहिली व त्यानंतर शिरूर येथे राहण्यास गेली.

जाबदेणार हे अंधश्रध्दाळु असल्याने ते देवऋषीचे ऐकतात. जाबदेणार यांचे लोणावळा येथे राहणारी बाई नामे भारती उर्फ कुंदा हिच्याशी जास्त संपर्कात आले. त्याबाबत अर्जदार हिने विचारणा केली असता जाबदेणार क्र.१ ने अर्जदार हिस तु माझ्यावर संशय का घेते म्हणून बेदम मारहान केली. तरी देखील जाबदेणार हा त्या बाईपासुन अलीप्त झाला नाही उलट दारू पिऊन अर्जदार हिस शिविगाळ करून मारहान करू लागला. जाबदेणार क्र.१ने अनेक मुलींशी अनैतिक संबंध ठेवले आहेत. सदर बाबत अर्जदार हिने विचारणा केली असता, तुला सहन करायचे असेल तर कर, नाहीतर घटस्फोट दे असे म्हणून दमदाटी करून गुलामासारखी वागणूक दिली. हे सर्व असह्य झाल्याने अर्जदार हिने थायमिट औषध पिले. त्यावर जाबदेणार क्र.१ ने इथुन पुढे असे करणार नाही अशी हमी दिली. तरी देखील जाबदेणार याच्यात सुधारणा झाली नाही व भारती नावाच्या बाईसोबत संबंध सुरू ठेवले. जाबदेणार याच्या वागण्यामुळे अर्जदार दि.०७/०२/२०१८ पासुन माहेरी राहत आहे. तेव्हापासुन जाबदेणार याने अर्जदार व मुलांची कोणतीही सोय केली नाही. उलट जाबदेणार यांनी अर्जदार व मुलाला मानसिक व शारिरिक त्रास देवून त्यांचे जगणे कठीण केले. म्हणून अर्जदार हिने जाबदेणार विरुध्द संरक्षण पोटगी, घरभाडे, नुकसान भरपाई मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदार ही जाबदेणारावर अवलंबून आहे. अर्जदार हिला स्वतःचे उत्पन्नाचे कुठलेही साधन नाही. तसेच कोणतेही कारण नसतांना जाबदेणारने अर्जदार हिचा त्याग करुन अन्न, वस्त्राची व इतर मुलभूत गरजांची सोय केलेली नाही. अर्जदार हि आई वडिलासोबत राहात असून तिचे माहेरची परिस्थीती अत्यंत हालकीची आहे व तिच्या सध्या उपासमारीची वेळ आली आहे. जाबदेणार याने अर्जदाराचा त्याग करुन स्वतः चैनीत आयुष्य जगत आहे. अर्जदाराचे माहेरी हालकीची परिस्थीती असल्याने त्यांना मुलीला व नातवाला सांभाळणे कठीण झाले आहे. अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही

अर्जदार स्वतःचा व मुलाचा चरितार्थ चालविण्यासाठी असमर्थ आहे. तसेच जाबदेणार हा अर्जदार हिचे राहणे, मुलाचे शिक्षण, आजारपण व उदरनिर्वाहाची कोणतेही सोय करत नाही म्हणुन अर्जदार हिने जाबदेणार यास अन्न, वस्त्र व मुलाचे शिक्षणाकरीता प्रतिमहा रु.२५,०००/– पोटगी व स्वतंत्र खोली घेउन राहण्याकरिता प्रतिमहा रु.५,०००/– घरभाडे मिळणे मागणी केली. तसेच अर्जदाराचा जाबदेणार क्र. १ ते ४ यांनी शारिरीक व मानसिक छळ केला असल्याने नुकसान भरपाई म्हणुन जाबदेणार यांनी अर्जदारास हिस रक्कम रु.५,००,०००/– मागणी केली असुन अर्जदार हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने अर्जदार हिस जाबदेणार कडुन वरीलप्रमाणे पोटगी मिळणे आवश्यक आहे.

४. अर्जदार हिने तिच्या अर्जात असे कथन केले कि, जाबदेणार यांची आर्थीक परिस्थीती चांगली असुन जाबदेणार क्र.१ हा सुप्रीम इंडस्ट्रीज मध्ये कामास असुन त्याला रू.२५,०००/– पगार आहे. तो गौरी प्लास्टीक फार्म कंपनीचा भागीदार असुन त्याला दरमहा रू.५०,०००/– मिळतात. तळेगांव येथील अर्धा गुंठातील २ खोल्याचे घर विक्री केले असुन त्याला रू.१५,००,०००/– रूपये मिळाले आहेत. जाबेदणार यांच्याकडे व्हेरेना कार क्र. एमएच/१२/एनइ/५१०९ आहे. तसेच जाबदेणार यांचा वडगांव मावळ येथे फ्लॅट मिळाला आहे. तसेच खंडाळा येथे वडिलोपार्जित १५ एकर ऊस बागायत शेती असुन त्यातुन त्यांना दरसाल रू.२०,००,०००/– रूपयांचे उत्पन्न मिळते. जाबदेणार क्र.२ हि पेंशनर असुन तिला ३०,०००/– प्रतिमहा पेंशन आहे. जाबदेणार क्र.१ यांचेवर अर्जदार क्र.१ व २ शिवाय कोणीही अवलंबुन नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करावा अशी अर्जदार हिने विनंती केली आहे.

५. जाबदेणार यांनी नि.क्र.२१ वर म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, अर्जदार हिचा अर्ज त्यांना मान्य व कबूल नाही. अर्जदार हिच्या अर्जातील मजकूर खोटा

असुन असे कोणतेही कारण घडले नसल्याचे सांगितले. अर्जदार हिचा अर्ज सकृतदर्शनी नसुन तो रद्द करण्यास विनंती केली. सदर अर्जात अर्जदार हिने बनावट, खोटा, काल्पनिक व चुकीचा मजकूर मांडला आहे. त्यांने असे कथन केले कि, जाबदेणार क्र.१ ते ४ यांनी अर्जदार हिस अपमानास्पद वागणुक दिली नाही. घरातील सर्व दागितने हे अर्जदार हिच्या ताब्यात आहेत. त्यांचा अंधश्रध्देवर विश्वास नाही. जाबदेणार क्र.१ चे कुठेही अनैतिक संबंध नाही व त्यांनी अर्जदार हिस घटस्फोट मागितला नाही. उलट अर्जदार हि स्वतःच्या मर्जीने माहेरी राहण्यास गेली. तिला सासरी नांदण्यास रूची नसल्याने ती वारंवार वेगळे राहण्याचा हट्ट करीत होती. अर्जदार हि संपत गरड नावाच्या व्यक्तीशी तासनतास फोनवर बोलायची. दोघांचे अनैतिक संबंध होते. तिचे घरात दुर्लक्ष होते. जाबदेणार हा मुलाला भेटण्यास गेला असता त्याला अर्जदार हिने प्रतिबंध केले. अर्जदार हिचा स्वभाव रागीट व तापट स्वरूपाचा आहे. अर्जदार हिने स्वतःहून संसाराचा त्याग केला. अर्जदार हिला जाबदेणार यांनी मानसिक व शारिरिक त्रास दिला नसल्याचे सांगितले. तसेच जाबदेणार क्र.१ने अर्जदार हिच्यासाठी ब्युटीपार्लर सुरू केले त्याचे बँकेचे हप्ते जाबदेणार क्र.१ फेडत आहेत. तसेच जाबदेणार याचे विरुध्द अर्जदाखल करण्यास कोणतेच सयुक्तीक कारण नसल्याने सदर अर्ज विनाकारण जाबदेणार यास त्रास देण्याच्या हेतूने दाखल केलेला असुन सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

६. वरील सर्व कथनांचे व पुराव्याचे अवलोकन केले. अर्जदार यांनी स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी अंतरीम पोटगी म्हणुन दरमहा रक्कम रु.१५,०००/- व मुलाला दरमहा १०,०००/- तसेच घर भाडे राहणेकरिता दरमहा रु.५,०००/- असे अर्ज दाखल तारेखपासुन मिळण्यास मागणी केली आहे. अर्जदाराने तिच्या अर्जात जाबदेणार क्र.१ हा कंपनीत कामाला असुन त्याला मासिक उत्पन्न रक्कम रु.२५,०००/- ऐवढे आहे असे कथन केले परंतु त्याबाबतचे स्टेटमेंट किंवा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. तसेच

गौरी प्लास्टीक फार्म कंपनीचा भागीदार म्हणून रू.५०,०००/–, अर्धा गुंठातील २ खोलीचे रू.१५,००,०००/– रूपये, व्हेरेना कार, वडगांव मावळ येथे फ्लॅट, तसेच जाबदेणार यांस शेतीपासुन दरसाल रू.२०,००,०००/– रूपयांचे उत्पन्न मिळते याबाबत अर्जदार हिने वरील सर्व उत्पन्नाबात लेखी अथवा कागदोपत्री पुरावा दिला नाही. दाखल ७/१२ उतारानुसार सदरची शेतजमीन ही कौंटुंबिक असुन सदर मिळकत हि वैयक्तीक जाबदेणार क्र.१ याचे नसुन संयुक्तीक कुटुंबाचे आहे. अर्जदार हिने कथन केल्याप्रमाणे जाबदेणार क्र.१ ला इतर उत्पन्नाचे साधनाचे लेखी किंवा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. जाबदेणार यांच्यावर घरातील कोणतीही व्यक्ती अवलंबुन नाही. अर्जदार हि तिच्या मुलाला घेवून सध्या तिच्या आई वडिलांसोबत राहत आहे. अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन नसल्याने तसेच जाबदेणार क्र.१ हा तिचा पती असल्याने अर्जदार क्र.१ व २ ची सांभाळण्याची जबाबदारी जाबदेणार क्र.१ वर आहे. जाबदेणार क्र.१ ने अर्जदार ब्युटीपार्लरचे व्यवसाय करीत असल्याचे व त्यातुन तीला उत्पन्न मिळत असल्याचे कथन केले आहे. परंतु त्याबाबतचा कोणताही पुरावा दाखल केला नाही.

७. अर्जदार हिला तिचा स्वतःचा चरितार्थ चालविण्यासाठी व अन्न,वस्त्र निवारा इत्यादी गोष्टीची पुर्तता करण्यासाठी इतर कोणतेही साधन नाही. तसेच मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी तिच्यावर असल्याने तिच्या तुटपुज्या उत्पन्नात तिचे व मुलाचे उदरनिर्वाह पुर्ण होत नसल्याचे प्रतिज्ञापत्रात कथन केले आहे. अर्जदार क्र.१ स्वतःचा व अर्जदार क्र.२ मुलाचा चरितार्थ चालविण्यासाठी असमर्थ असल्याचे दिसुन येते. परंतु यावेळी हेही विचारात घेणे गरजेचे आहे की, जाबदेणार क्र.१ हा तरूण असुन तो कोणताही कामधंदा करण्यास सक्षम आहे. तसेच संयुक्त मिळकतीमधून उत्पन्न मिळत असल्याची बाब नाकारता येत नाही. तसेच प्रचलीत मजूरीच्या दराप्रमाणे तो दररोज ५०० ते ६०० याप्रमाणे दरमहा रू.१५,००० ते १८,०००/– मिळवत असेल असा अन्वयार्थ करता येईल. सबब

जाबदेणार याने अर्जदाराचे पालनपोषण करण्यास नकार दिला व तिचा त्याग केला. तसेच अर्जदार स्वतःचा चरितार्थ चालविण्यास असमर्थ आहे असे शाबीत होते.

८. तसेच प्रथमदर्शनी अर्जदार व जाबदेणार क्र.१ हे विभक्त राहत असल्याचे दिसुन येते. सदर परिस्थीती विचारात घेता अर्जदार हि जाबदेणार क्र.१ ची पत्नी असल्यामुळे तिच्या पोटगीची तरतुद करण्याची जबाबदारी जाबदेणार क्र.१ याची आहे. अर्जदार हि सद्या तिच्या आईवडीलांसोबत राहत असुन तिने अन्न, वस्त्र, निवारा, मुलाचे शिक्षण व इतर प्राथमिक गरजांसाठी एकुण रू.२५,०००/– जाबदेणाराकडून मिळण्याची मागणी केली आहे. परंतु अर्जदाराला सद्यापरिस्थितीमध्ये किती खर्च आहे अथवा खर्च झाला आहे किंवा त्याबाबतच्या पावत्या किंवा लेखी पुरावा यापैकी काहीही अभिलेखावर दाखल केले नाही. तसेच अर्जदार यांनी त्यांच्या मेडीकलबाबत, मुलाच्या शिक्षणाबाबत खर्च असा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. वर नमुद केल्याप्रमाणे जाबदेणार क्र.१ चे उत्पन्न व अर्जदाराच्या प्राथमिक गरजा व उभयपक्षकाराचे राहणीमान विचारात घेता जाबदेणार क्र.१ने अर्जदार क्र.१ हिस दरमहा रू.४०००/– पोटगी व अर्जदार क्र.२ आयुष (मुलगा) यास दरमहा रू.३०००/– पोटगी मिळणे आवश्यक आहे. तसेच स्वतंत्र खोली घेउन राहण्याकरिता प्रतिमहा रु.३,०००/– घरभाडे देणे उचित ठरेल असे माझे मत आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे,

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मजूर करण्यात आला.

२. जाबदेणार क्र.१ यास असा निर्देश देण्यात येतो की, त्याने अर्जदार क्र.१ हिस प्रतिमहा रक्कम रू.४,०००/– अंतरीम पोटगी व अर्जदार क्र.२ आयुष (मुलगा) यांस दरमहा रू.३,०००/– अंतरीम पोटगी व घरभाडे म्हणुन दरमहा रक्कम रु.३,०००/– दयावे सदरचा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन सदर प्रकरणाचा अंतीम निकाल लागेपर्यंत दयावेत.

३. जाबदेणार क्र.१ ते ४ यांनी अर्जदार हिच्या राहत्या घरी अथवा माहेरच्या ठिकाणी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे हस्ते परहस्ते येवून त्रास देवू नये अथवा हिंसाचार करू नये.

४. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना विनामुल्य देण्यात यावी.

५. सदर आदेशाची प्रत संरक्षणाधिकारी व संबंधित पोलीस स्टेशन यांच्याकडे पाठविण्यात यावी.

JAVEED ABUBAKAR ZARI

Digitally signed by JAVEED ABUBAKAR ZARI
Date: 2024.03.27 18:00:42 +0530

स्थळ–घोडनदी–शिरुर

दि.२१.०३.२०२४

**(जा. अ. झारी)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

घोडनदी–शिरुर, जि. पुणे

<table>
<tr><td colspan="2">

<u>**CERTIFICATE**</u>

I affirms that the contents of this P.D.F. file order are same word for word as per original order -
</td></tr>
<tr><td>Name of the Court :-</td><td>**J.A. Zari,**<br>Judicial Magistrate First Class,<br>Ghodnadi (Shirur) Pune</td></tr>
<tr><td>Name of the Steno :-</td><td>M S Zade</td></tr>
<tr><td>Date of Order :-</td><td>21.03.2024</td></tr>
<tr><td>Order signed by presiding officer :-</td><td>21.03.2024</td></tr>
<tr><td>Order uploaded on :-</td><td>27.03.2024</td></tr>
</table>